# राजर्षी शाहू महाराज : जीवन आणि कार्य एक चिकित्सक अभ्यास

**Dr. Sande Rajesaheb Nabi**, Associate Professor, Department of Economics (HOD), Adarsh College, Vita, Khanapur, Sangli, sanderaj2013@gmail.com, 8329721890.

---

**गोषवारा**

स्वातंत्र्यपूर्व काळात भारतामध्ये अनेक संस्थांनी होती. त्यामध्ये प्रामुख्याने कोल्हापूर आणि बडोदा ही दोन पश्चिम भारतातील संस्थाने महत्वाची होती. कारण इतर संस्थाने ही केवळ राज्यकारभार करीत होती परंतु कोल्हापूर व बडोदा संस्थानातील राजे सामाजिक जाणीवेतून कार्य करीत होते. कोल्हापूर संस्थानातील शाहू महाराज यांनी समाजातील जी अस्पृश्यता होती ती नष्ट करण्यासाठी अनेक ध्येयधोरणे जाहीर केली होती. तसेच शेती कला संस्कृती राजकारण चळवळ अस्पृश्यता निवारण इत्यादी अनेक क्षेत्रांमध्ये काम केले होते. शाहू महाराजांनी कुस्त्या, अस्पृश्यता निवारण बरोबरच बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिक्षणासाठी मदत केली होती. त्यानंतर अस्पृश्यता निवारण करण्यासाठी माणगाव परिषद येथे सहभागी झाले होते. एकूण भारताच्या विकासामध्ये शाहू महाराजांनी आपले योगदान दिले आहे, या सर्व योगदानातील महत्त्वाच्या कामाची चर्चा आपण प्रस्तुत रिसर्च पेपर मध्ये करणार आहोत.

**मुख्य शब्द :** लोकराजा, राजर्षी शाहू महाराज, सामाजिक, बहुजन, कोल्हापूर, महाराष्ट्र, शिक्षण, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक, कायदेविषयक जीवन आणि कार्य, अस्पृश्यता, इत्यादी.

**प्रस्तावना :**

लोकराजा राजर्षी शाहू महाराज यांचे कार्य समाजातील सर्व क्षेत्रांमध्ये अलौकिक अशा प्रकारचे आहे. शाहू महाराजांनी सामाजिक सुधारणा बरोबर साहित्य कला शेती सुधारणा कुस्ती जल प्रकल्प उभारणी अशा विविध क्षेत्रांमध्ये अत्यंत चांगल्या पद्धतीचे कार्य केले आहे. शाहू महाराजांच्या कार्याची ओळख शहरातील भव्य उभा राहिलेल्या वास्तूमधून दिसते. शाहू महाराजांनी केलेले कार्य संपूर्ण भारतामध्ये नावलौकिक अशा प्रकारचे आहे. आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये शाहू महाराजांचे नाव आदर्श राजा दलितांनी बहुजन समाजाचा नेता आणि प्रजाहित दक्ष राजा असे उल्लेखनीय आहे. लोकनेते शाहू महाराज यांचा जन्म 26 जून 1874 रोजी कोल्हापूर जिल्ह्यातील कागल येथील घाटगे करण्यात झाला. शाहू महाराजांचे मूळ नाव यशवंतराव असे होते. 17 मार्च 1884 रोजी कोल्हापूर संस्थांचे चौथे राजे यांच्या पत्नी आनंदीबाई साहेब यांनी यशवंतराव यांना दत्त घेतले आणि दत्तक घेतल्यानंतर यशवंतरावांचे नाव आनंदीबाईसाहेब यांनी शाहू छत्रपती असे ठेवले. तेव्हापासून शाहू महाराज यांनी समाजातील सर्व क्षेत्रांमध्ये केलेले कार्य अलौकिक अशा प्रकारचे आहे. 1890 ते 1894 या काळात धारवाड येथे शाहू महाराजांचे शिक्षण झाले. दोन एप्रिल 1894 रोजी कोल्हापूर संस्थांची सर्व सूत्रे शाहू महाराजांनी हाती घेतली. शाहू महाराजांनी समाजातील सर्व जाती धर्मातील लोकांना जगण्यासाठी प्रोत्साहन दिले त्याचबरोबर त्यांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले.

**संशोधनाच्या समस्या :**

भारतासारख्या विकसनशील आणि कृषीप्रधान लोकशाही राष्ट्रांमध्ये छत्रपती शाहू महाराज यांनी केलेले कार्य अलौकिक अशा स्वरूपाचे आहे परंतु सध्याच्या परिस्थितीमध्ये शाहू महाराजांच्या कार्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून नवनवीन तंत्रज्ञान विकसित करण्याबरोबर सामाजिक गुणवत्ता सुधारणे अत्यंत महत्त्वाचे आहे. परंतु शाहू महाराजांचा आदर्श आणि समाजातील सामाजिक हित जोपासणाऱ्या व्यक्तींचा आदर्श डोळ्यासमोर न ठेवता सध्याची आधुनिक पद्धत सुरू आहे ही एक मोठी समस्या दिसून येते. जुन्या परंपरागत शेती पद्धतीचा अवलंब करण्याबरोबर शाहू महाराजांनी अनेक नवनवीन आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारलेली आहेत. सध्याच्या परिस्थितीमध्ये आर्थिक सामाजिक राजकीय धार्मिक सांस्कृतिक कायदेविषयक आणि पर्यावरण विषयक अशा सर्व क्षेत्रांमध्ये अनेक प्रकारच्या समस्या दिसून येतात परंतु शाहू महाराजांनी या प्रत्येक क्षेत्रामध्ये जे कार्य केले आहे त्या कार्याचा विसर सध्याची परिस्थिती करू लागलेली आहे त्यामुळे ही एक मोठी समस्या दिसून येते.

**संशोधनाची उद्दिष्टे :**सदरचे संशोधन करीत असताना लोकनेता शाहू महाराज यांचे जीवन आणि कार्य यांचा अभ्यास करणे हा संशोधनाचा मुख्य उद्देश असून काही विशिष्ट उद्दिष्टे संशोधकाने सदरच्या संशोधन विषयांमध्ये खालील प्रमाणे दिलेली आहेत.

**संशोधनाचे महत्त्व :**शाहू महाराजांनी केलेले कार्य सध्याच्या परिस्थितीमध्ये अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण शाहू महाराजांनी आर्थिक सामाजिक राजकीय धार्मिक सांस्कृतिक कायदेविषयक आणि पर्यावरण विषयक अशा सर्व क्षेत्रांमध्ये अलौकिक अशा स्वरूपाचे कार्य केले आहे, त्यामुळे सध्याच्या परिस्थितीमध्ये या कार्याचा उपयोग समाजातील सर्व जाती धर्मातील घटकांना होतो आहे. शाहू महाराजांचे कार्य विचारात घेता सध्याच्या परिस्थितीमध्ये समाजकारण आणि राजकारण यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

संशोधनाची व्याप्ती :

शाहू महाराजांचे कार्य हे फक्त महाराष्ट्र पुरते मर्यादित नसून ते संपूर्ण भारताच्या गुणवत्ता दर्शक विकासासाठी महत्त्वाचे असल्यामुळे सदरच्या संशोधनाची व्याप्ती ही संपूर्ण भारत अशी आहे. संपूर्ण भारतभर शाहू महाराजांनी अत्यंत प्रामाणिकपणे कार्य केले आहे.

**संशोधनाची मर्यादा :**राजर्षी शाहू महाराज यांचे कार्य आणि त्यांनी केलेल्या सामाजिक अलौकिक कामगिरीबद्दल सध्याच्या आधुनिकीकरणांमध्ये अत्यंत महत्त्वाचे स्थान त्यांना दिले जाते. परंतु शाहू महाराजांनी ज्या पद्धतीने कार्य केले त्या पद्धतीची कार्य सध्याच्या परिस्थितीत केली जात नाहीत त्यामुळे ती एक मोठी मर्यादा दिसून येते. शाहू महाराजांच्या बरोबर बडोद्याचे सयाजीराव गायकवाड यांनीही सामाजिक हिताचे कार्य केले आहे परंतु संशोधकाने सदरचा रिसर्च पेपर करताना कोल्हापूर संस्थांचे राजे शाहू महाराज यांच्या जीवन व कार्याचा फक्त आढावा घेतलेला आहे ही एक या संशोधनाची मर्यादा दिसून येते.

**संशोधन कार्यप्रणाली :**भारतातील राजर्षी शाहू महाराज यांच्या सामाजिक आर्थिक धार्मिक सांस्कृतिक आणि कायदेविषयक तसेच पर्यावरण विषयक क कार्याचा आढावा घेण्यासाठी संशोधकाने दुय्यम संशोधनांचा वापर केला आहे. यामध्ये क्रमिक पुस्तके संदर्भ पुस्तके रिसर्च पेपर रिसर्च आर्टिकल्स जर्नल्स वर्तमानपत्रे इंटरनेट वार्षिक अहवाल मासिकेमाशी के वार्षिक अंक इत्यादी सर्व प्रकारच्या दुय्यम संशोधनांचा यामध्ये वापर केलेला आहे. तसेच सदरचे संशोधन करीत असताना संशोधकाने वर्णनात्मक विश्लेषण संशोधन पद्धत सदरचा रिसर्च पेपर करताना वापरलेली आहे. यामध्ये संशोधकाने सर्व दुय्यम संसाधनाद्वारे माहितीचे संकलन करून संशोधन केले आहे.

**परिणाम आणि चर्चा :** राजर्षी शाहू महाराजांनी महाराष्ट्राच्या समाज जीवनामध्ये अत्यंत चांगल्या पद्धतीचे कार्य केले आहे. स्वतःच्या अपमानाच्या भावनेपेक्षा सामाजिक आणि सांस्कृतिक अन्यायाची शाहू महाराजांना चीड होती. मानवी मूल्याची जाणीव ठेवणारे शाहू महाराज व मानवी प्रवृत्ती विरुद्ध आयुष्यभर लढले. समाजातील अस्पृश्य जातींना न्याय देणे आणि लोकशाही समाजाची बांधणी करणे या संदर्भात केवळ विचार मांडले नाहीत तर हातात असलेल्या राजसत्तेचा वापर करून जाणीवपूर्वक आणि तितक्याच निर्धाराने सामाजिक व आर्थिक न्यायासाठी अनेक निर्णय घेतले. शाहू महाराजांनी सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी अनेक विचार मांडले आणि त्या विचाराच्या अनुषंगाने कृतीही केली. शाहू महाराजांनी 26 जुलै 1902 रोजी एक जाहीरनामा प्रसिद्ध केला.

**राजर्षी शाहू महाराज आणि आरक्षण विषयक विचार :** सध्या कोल्हापूर संस्थानातील सर्व वर्गाच्या लोकांना शिक्षण देण्याबद्दल व त्यास उत्तेजन देण्याबद्दल प्रयत्न केले आहेत परंतु त्यात अपेक्षेप्रमाणे यश आले नाही ही परिस्थिती दूर करण्यासाठी व संस्थानातील लोकांना उच्च शिक्षण मिळवण्यासाठी व उत्तेजन देण्यासाठी या वर्गाकरिता आज पर्यंतच्या प्रमाणापेक्षा जास्त जागा राखून ठेवणे योग्य ठरेल असे सरकारने ठरवले आहे. या धोरणाला अनुसरून या हुकमाच्या तारखेपासून ज्या जागा मोकळ्या पडतील त्यापैकी शेकडा 50% जागा मागासलेल्या वर्गातील लोकांना देण्यात येतील. ज्या ऑफिसमध्ये मागासलेल्या वर्गाच्या अंमलदाराचे प्रमाण सध्या शेकडा 50% पेक्षा कमी असेल तर पुढची नेमणूक ह्या वर्गातील व्यक्तीची करावी. प्रत्येक खात्याच्या मुख्यांनी या जाहीरनाम्याच्या प्रसिद्धीनंतर भरण्यात आलेल्या जागांचे किमाई अहवाल सादर केले पाहिजेत असा आदेश किंवा जाहीरनामा राजर्षी शाहू महाराजांनी जारी केला. स्वराज्य मागणीच्यावेळी मागास जातींनी सत्तेत आपला योग्य वाटा मिळवण्यासाठी राखीव जागांची मागणी करावी असे राजर्षी शाहू महाराजांचे मत होते. आपल्या संस्थांना त्यांनी मागास जातीसाठी 50% जागा राखीव ठेवल्या होत्या. लोकशाहीचे तत्व व स्वराज्याची मागणी योग्य असली तरी सत्तेचे योग्य वाटप करण्यासाठी ते एका पुढारलेल्या जातीच्या हाती सत्ता जाऊ नये असे त्यांचे स्वतःचे मत होते. आम्ही स्वराज्यास पात्र झाले पाहिजे आणि ज्या कारणामुळे आमचे स्वराज्य गेले त्या कारणांचा तिरस्कार केला पाहिजे, भारतात जाती संस्था पूर्णतः नष्ट केल्याशिवाय येथे खरे स्वातंत्र्य टिकणार नाही असे शाहू महाराजांचे मत होते. छत्रपती शाहू महाराज असे म्हणतात की सत्ता केवळ अल्पसंख्यांक उच्च वर्ण यांच्या हातात जाण्याचे स्वराज्याचे पर्यवसान होऊ नये म्हणून निदान दहा वर्षे तरी आम्हाला प्रतिनिधी निवडून देण्याचा हक्क असला पाहिजे. यामुळे आमचे हक्क काय आहेत याची आम्हाला शिक्षण मिळेल. जातवार प्रतिनिधी देण्याचा हक्क नसल्यामुळे आमच्या समाजाशी शौचनीय अनुभव आमच्या पुढे आहे. ब्राह्मणांच्या हाती जर आपणास स्वराज्याची सत्ता जाऊद्या द्यायची असेल तर आपल्या अधिकाराबाबत जागृत व्हा असे त्यांचे मत होते. सर्व जातीतील लोक पुढे येऊन त्यांना सामाजिक औद्योगिक शिक्षण सरकारी नोकरी वगैरे बाबतीत आपापली जबाबदारी पूर्ण करण्याचे सामर्थ्य येणे यास मी जातवार प्रतिनिधित्व म्हणतो. यात कोणाचाही द्वेष अपेक्षित नसून याद्वारा मागास जाती स्वतःच्या ताकदीवर पुढे नेण्याचा प्रयत्न करीत आहेत. मागास जातींना कडेवर घेऊन जाऊ नका पण त्यांना उत्तेजन द्या प्रतिबंध करू नका कारण आमची धडपड आमच्या अंगी शक्ती येण्यासाठी आहे. राजर्षी शाहू महाराजांनी यासाठी जातवार प्रतिनिधित्वाची मागणी केली. मद्रास मध्ये काँग्रेस पक्षाविरुद्ध जस्टीस पार्टीचे जे राजकारण होते ते मुंबई इलाख्यात सुरू करण्याचा त्यांचा विचार होता. त्यामुळे ब्राह्मणांची परिषद भरून ही सत्ता वाटपाची चळवळ चिकाटीने चालवा असे त्यांचे सांगणे होते.

**अस्पृश्यता निवारण आणि शाहू महाराज :** राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानातील सर्वच मागासलेल्या जातीच्या विद्यार्थ्यांना वस्तीग्रह स्थापन केली. राज्यरोहणाच्या समयी संस्थानात अस्पृश्यासाठी फक्त पाच शाळा होत्या व त्यामधील विद्यार्थ्यांची संख्या 168 होती. 1907 ते 8 मध्ये अस्पृश शाळांची संख्या 16 व विद्यार्थ्यांची संख्या 416 एवढी झाली. महाराजांच्या अथक प्रयत्नांनी शाळांची संख्या वाढत गेली आणि चार वर्षात 1912 मध्ये अस्पृश्य शाळांची संख्या 27 व विद्यार्थ्यांची संख्या 636 एवढी झाली. राजर्षी शाहू महाराजांच्या अथक प्रयत्नांनी शाळांची आणि विद्यार्थ्यांची संख्या कायमस्वरूपी वाढतच गेली. अस्पृश्यावर लावणीच्या अमानुष अशा हजेरीच्या पद्धतीने निर्मूलन 1918 साली करण्यात आले. अस्पृश्यांच्या विशेषतः महार समाजाच्या माथ्यावर अमानुष पद्धती लादल्या गेलेल्या होत्या. महार वतना बरोबर येणारी वतनाची सरकार दरबारची म्हणून जी कामे होती ती वतनदार म्हणून महारांना करावीच लागणार होती. शाहू महाराजांनी कुलकर्णीचे वतन खालसा करून त्या ऐवजी तलाठी

नेमण्याची पद्धत स्वीकारली. तलाठ्याच्या जागावर मागासलेल्या वर्गातील विशेषता अस्पृश्य वर्गातील लोकांची वर्णी लागावी यासाठी तलाठी वर्ग सुरू करून त्यात अस्पृश्य उमेदवारांना विशेष शिष्यवृत्ती देऊन प्रशिक्षित केले गेले. माणगावच्या अस्पृश्य परिषदेत भाषण करताना भर सभेत शाहू महाराजांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना सोनतळी कॅम्पवर आपल्याबरोबर भोजनास यावे अशी विनंती केली. मी 1920 मध्ये नागपूरला अखिल भारतीय बहिष्कृत परिषदेच्या अध्यक्षपदाचा मान शाहू महाराजांना दिला गेला.

**आरक्षण आणि शाहू महाराज :** इंग्रजी राजवटीत शूद्र यांना प्रथम शिक्षण घेण्याची संधी मिळाली असली तरी संधीची समानता असल्याखेरीज दारिद्र्यामुळे शूद्रातिशुद्रामध्ये शिक्षणाचा प्रसार होणार नाही असे महात्मा फुले यांची खात्री झाली होती. शिक्षणाचा लाभ खेडे गावच्या मुलास प्राप्त व्हावा या उद्देशाने हडपसर येथे दरमहा 10 रुपये खर्च करण्यात इतकी ही सत्यशोधक समाजाची तसेच गावकऱ्यांची ऐपत नसल्यामुळे शाळा बंद करावी लागली होती. शाळातून गरीब लोकांची मुले शेकडा पाच मोफत घेण्याचा हुकूम शिक्षण संचालक यांनी काढल्याबद्दल त्यांचे सत्यशोधक समाजाने आभार मानले. शुद्रातिशुद्रांना शिक्षणाचा अधिकार द्यावा तसेच त्यांच्या संस्थेच्या प्रमाणात अधिकार पदावर नेमणुका कराव्यात असा महात्मा फुलेंनी आयुष्यभर जसा आग्रह धरला तसा 19 व्या शतकातील भारतातल्या अन्य समाज सुधारकाने आग्रह धरलेला दिसत नाही. महाराजा सयाजीराव गायकवाड आणि कोल्हापूर संस्थानातील शाहू महाराज या दोन संस्थांच्या महाराजांनी आपल्या संस्थांच्या हद्दीत शुद्रातिशूद्रांना शिक्षण घेण्याची संधी मिळावी म्हणून शाळा सुरू केल्या व त्या समाजातील होतकरू व बुद्धिमान विद्यार्थ्यांना परदेशातील विद्यापीठात प्रवेश मिळवून उच्च शिक्षण घेता यावे यासाठी शिष्यवृत्ती दिल्या होत्या. या दोन्ही महाराजांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना शिक्षणासाठी सहाय्य केले आहे हे सर्वज्ञात आहे.

**मंदिर प्रवेश जाहीरनामा आणि शाहू महाराज :**छत्रपती शाहू महाराजांच्या कारकिर्दीत जुन्या राजवाड्यातील कुलस्वामिनी अंबिकेचे दर्शन बहिष्कृत वर्गाला झाले नव्हते. परंतु छत्रपती राजाराम महाराजांच्या कारकीर्दीत ते दर्शन त्यांना प्रत्यक्ष घेता येऊ लागले. बाबासाहेब आंबेडकरांनी मंदिर प्रवेशाची चळवळ सुरू केली आणि याचा परिणाम महाराष्ट्रात काही ठिकाणी चळवळी उभ्या राहिल्या. कोल्हापूर संस्था नाही या चळवळीत मागे राहिले नाही. 25 सप्टेंबर 1932 रोजी कोल्हापूर येथील महालक्ष्मी देवालयात मुक्त द्वार भोजन समारंभ आयोजित केला आणि महालक्ष्मी देवालय दलितांना खुले झाले.

**सामाजिक बहिष्कार प्रतिबंधक कायदा :**महार वतनाचा कायदा सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यांना प्रवेश, वेळवरळा, प्रतिबंधक कायदा, देवदासी, मुरळी कायदा असे अनेक समाजसुधारक कायदे शाहू महाराजांनी केले होते. जोपर्यंत समाजाचे सामाजिक व मानसिक परिवर्तन होत नाही तोपर्यंत कायदे करू नये त्याचा फारसा उपयोग होत नसतो. वरील सर्व कायदे असून सुद्धा अस्पृश्यावरील अन्याय अत्याचार थांबले नाहीत. अस्पृश्य वर्गाच्या आर्थिक नाड्या वरिष्ठ समाजाच्या हातात होत्या. वरिष्ठ जातीतील लोक सनातनी व करमट असल्याने अस्पृश्यातील सामाजिक अत्याचार सुरूच होते. दलितांनी सार्वजनिक ठिकाणी प्रवेश केला आणि सार्वजनिक पानवट्यावर पाणी भरले अथवा जुन्या परंपरा नाकारल्या की लगेच सर्व समाज संघटितपणे दलितावर सामाजिक बहिष्कार घालत असे त्यामुळे दलितांचा आर्थिक कोंडमारा होत होता त्यामुळे शाहू महाराजांनी सामाजिक बहिष्कार प्रतिबंधक कायदा 1939 मध्ये पास केला.

**मोफत व सक्तीचे शिक्षण कायदा :** शाहू महाराजांनी शिक्षणाच्या संदर्भात महत्त्वाचे निर्णय घेतलेले होते. कोल्हापूर संस्थानातील जनतेला प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करावे यासंदर्भात 24 जुलै 1917 रोजी जाहीर केले, की येणाऱ्या गणेश चतुर्थी पासून करवीर इलाख्यात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्याचे आहे. सध्या असलेल्या सर्व प्राथमिक शाळातील फी सदर दिवसापासून माफ करण्यात येत आहे असा कायदा करण्यात आला. या संदर्भात नियमावली तयार करण्यासाठी करमळकर मराठी व पंडितराव अशा तीन ब्राह्मण शिक्षण तज्ज्ञांची समिती नेमली. या सक्तीच्या शिक्षणासाठी एक लाख रुपये खर्च करण्याचे जाहीर केले आणि त्यापैकी 80 हजार रुपये दरबार खजिन्यातून तर वीस हजार रुपये देवस्थान फंडातून खर्च होणार होते. 21 सप्टेंबर 1917 रोजी शिक्षण तज्ज्ञांनी तयार केलेल्या नियमावलीवर आधारित सक्तीच्या शिक्षणाचा कायदा जाहीर केला. या कायद्याद्वारे शिक्षणास योग्य वयाची मुले शाळेत पाठविण्याची आई-वडिलांच्यावर सक्ती करण्यात आली. त्यांनी तशी पाठवली नाही तर त्यांना प्रत्येक एक रुपया महिना दंड करण्याची तरतूद करण्यात आली होती.

**विद्यार्थी वसतिगृहे आणि शाहू महाराज :** कोल्हापूर म्हणजे विद्यार्थी वस्तीग्रहांची माता असे म्हणण्यात शाहू महाराजांना आनंद व सार्थ अभिमान वाटत असे. या दृष्टीने त्यांचे नाशिक येथील भाषण मोठे उद्बोधक आहे. नाशिक येथे 15 एप्रिल 1920 रोजी उदाजी मराठा वस्तीगृहाची कोण शीला बसवताना त्यांनी असे सांगितले आहे की, ब्रिटिश पार्लमेंटला मदर ऑफ पार्लमेंट असे मोठ्या अभिमानाने इंग्रज व इतर लोक म्हणतात त्याचप्रमाणे कोल्हापुरास मदर ऑफ बोर्डिंग हाऊस असे विद्यार्थी वस्तीग्रहांची माता असे सार्थ नाव मिळाले आहे. तेथे मराठा जैन लिंगायत सारस्वत मुसलमान दैवज्ञ पांचाळ शिंपी कायस्थ प्रभू यांच्या मुलाकरिता विद्यार्थी वस्तीग्रह आहेत. आर्य समाज सर्वास सारखे लेखन गुरुकुल चालवीत आहे. शिवाय अस्पृश्य लोकांच्या विद्यार्थ्यांकरिता तशी संस्था काढून अस्पृश्यांचा अस्पृश्यपणा काढून टाकण्यामध्येही कोल्हापूरच्या लोकांनी पुढाकार घेतला. शहरात वस्तीग्रह नसली तर अनेक होतकरू विद्यार्थ्यांची शिकण्याची इच्छा असूनही त्यांना शिक्षण घेणे शक्य होत नाही हे शाहू महाराजांना दिसून आले होते. शाळा कॉलेजची द्वारे उघडी ठेवली की सर्वांनाच त्यामध्ये शिक्षण घेणे जमेल असे नाही. प्रत्येक विद्यार्थ्यांची शहरात राहण्याची सोय नसते,

प्रत्येकाची गरीबी व जात आडवी येते हे पाहून शाहू महाराजांनी 1896 साली कोल्हापुरात सर्व जाती जमातीसाठी एक एक बोर्डिंग काढले होते.

**शाहू महाराजांचा राष्ट्रीय दृष्टिकोन :** जातवार वस्तीग्रह काढण्यामागे शाहू महाराजांचा त्या त्या जातीतील पुढाऱ्याचे व कार्यकर्त्याचे अशा वस्तीग्रहणा आर्थिक सहाय्य मिळवण्याचाही हेतू होता. सर्वसाधारण माणसास दुसऱ्या जातीपेक्षा आपली जात जास्त प्रिय असते. आपल्या जातीसाठी थोडी बहुत झीज शोषण्यास तो तयार असतो हे ओळखून शाहू महाराजांनी प्रत्येक जातीतील पुढारी व कार्यकर्ते बोलून त्यांना बोर्डिंग स्थापण्यास व ती चालवण्यास प्रवृत्त केले होते. नंतरच्या कालखंडात कोल्हापुरात वीस बोर्डिंग स्थापन झाली. त्यामागे शाहू महाराजांची 25 वर्षाची तपश्चर्या होती. जातिवाचक वसतिगृह काढली तरी त्यांच्या अलगपणाची भावना राहू नये म्हणून ही बोर्डिंग शक्यतो शेजारी शेजारी ठेवण्याची शाहू महाराजांनी योजना केली आणि त्यांनी गंगावेशीतून रंकाळा वेशीकडे जाणाऱ्या रस्त्यावर सहा वस्तीग्रहणांना व दसरा चौकाच्या परिसरात सात वस्तीग्रहणांना जागा व काहींना इमारतीसह जागा दिल्या.

**कलाप्रेमी शाहू महाराज :** कोल्हापूर बडोदे व ग्वाल्हेर या तीन संस्थानांचे अधिपती अनुक्रमे राजर्षी शाहू महाराज श्रीमंत सयाजीराव गायकवाड व श्रीमंत माधव महाराज शिंदे यांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जडणघडणीमध्ये फार मोलाची कामगिरी केलेली आहे. सार्वजनिक जीवनाच्या विविध क्षेत्रात अनेक होतकरू व हुशार तरुणांना पुढे घेऊन जाण्यासाठी त्यांनी फार मोठे सहाय्य केले आहे. साहित्य संगीत व कला या विविध क्षेत्रात त्यांच्या सक्रिय उद्योजनामुळे फार मोठी भर पडली आहे. त्यांच्याप्रमाणे इंदूर धार आधी मराठी संस्थानिकांनीही आपापल्या परीने होतकरू व कर्तुत्वान मराठी माणसांना पुढे घेऊन जाण्यासाठी मदत केली. या सर्व संस्थानिकामध्ये कोल्हापूरचे शाहू महाराज यांचे नाव अग्रस्थानी आहे.

**नाट्यप्रेमी राजर्षी शाहू महाराज :**कोल्हापूरच्या किंबहुना महाराष्ट्राच्या नाट्य व संगीत कलेचा विचार करावयाचा झाला तर राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रचंड कार्यकर्तृत्वाचा विसर पडून चालणार नाही. कलेच्या या प्रांतात महाराजांचे कार्य बहुरंगी विविध अंगी दर्जेदार अचूक दृष्टीने व मौलिक स्वरूपाचे आहे. शाहू महाराज यांच्या राजकारण समाजकारण शिक्षण कार्य मल्लविद्या इत्यादी कार्याबाबतचा बोलबाला सर्वत्र आहे. परंतु नाट्य संगीतादी कलांच्या बाबतीत शाहू महाराजांनी प्रचंड मोठे कार्य केले आहे याची प्रचिती येते. शाहू महाराजांचा कालखंड 1874 ते 1922 असा आहे.

**राजर्षी आणि शाहीर तमासगीर व कवी :** राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे महाराष्ट्राच्या सामाजिक शैक्षणिक व सांस्कृतिक क्रांतीचे प्रणेते म्हणून मान्यता पावलेले आहेत. जातीय विषमतेविरुद्ध व उच्चनीचतेविरुद्ध बंड पुकारून सामाजिक सत्ता स्थापन करणारा रयतेचा राजा म्हणून त्यांचे नाव सर्वत्र गाजलेले आहे. आपल्या सुधारणा प्रिय चारित्राने छत्रपती घराण्याचे नाव त्यांनी जसे गाजवले तसेच महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळीचे नेतृत्व स्वीकारून आपले सामर्थ्य सिद्ध केले. पददलित समाजाला जागे करून त्याच्यामध्ये स्वाभिमानाची ज्योत पेटवण्याचे अत्यंत महत्त्वाचे कार्य छत्रपती शाहू महाराजांनी पूर्ण केले. महाराष्ट्राला मार्गदर्शन करणारा कोल्हापूर संस्थानाचा सर्वांगीण विकास करणारा छत्रपती शाहू महाराज महाराष्ट्राला एक देणगी होती. शाहू महाराजांच्या काळात प्राथमिक शिक्षण घराघरातून सुरू झाले. सर्व जाती-जमातींना शिक्षणाच्या सवलती शाहू महाराजांनी निर्माण करून दिल्या आणि शेती व्यवसायाच्या विकासावर आर्थिक प्रगती अवलंबून आहे हे शाहू महाराजांनी सांगितले. व्यवसायास औद्योगिकीकरणाची जोड दिली तरच आपली चांगली प्रगती होईल असे त्यांनी सांगितले आहे. कला व क्रीडा गुणांनी संपन्न असलेल्यांची संपन्नता जोपासणे आवश्यक आहे हे ओळखून कलावंतांना चित्रकारांना संगीतात ज्ञान शाहिरांना व मल्लांना त्यांनी आश्रय दिला होता. अस्पृश्यांना समाजात मानाचे स्थान मिळावे यासाठी तेच प्रयत्नशील होते.

**दलित समाज आणि शाहू महाराज :** राजर्षी शाहू महाराज हे दलित समाजाचे खरे दुःख समजावून घेणारे होते. दलितांचा सर्वांगीण उद्धार करण्याच्या बाबतीत शाहू महाराजांनी कृती केली. अस्पृश्यता निवारणाच्या कामी व सामाजिक समता निर्माण करण्याच्या प्रश्नात त्यांचे विचार व कार्य मूलगामी आणि क्रांतिकारक होते. बोले तैसा चाले अशीच त्यांची दलितांच्या प्रश्नावर ठाम भूमिका होती. शाहू महाराजांनी दलित व अस्पृश्य यांचे प्रश्न सोडवण्याच्या बाबतीत मुलगा मी विचार मांडले. त्या विचारांना आपल्या राज्यात कायद्याचे स्वरूप दिले विशेष म्हणजे त्यांनी केलेले कायदे व काढलेले वटहुकूम यांची अंमलबजावणी स्वतः शाहू महाराज काटेकोरपणे करीत होते. आपल्या राज्यातील सर्व दलितांना आपल्या विचारांचा व कृतींचा आधार देऊन त्यांना मोठा दिलासा दिला.

**शाहू महाराज यांचे शेती व सहकार विषयक विचार :** भारतासारख्या शेतीप्रधान अर्थव्यवस्थेत शेती तिचा विकास तिचे आधुनिकीकरण हा विषय अत्यंत महत्त्वाचा ठरतो. प्राचीन व मध्ययुगीन काळातही शेती हेच भारतीयांच्या उदरनिर्वाहाचे व व्यापाराचे साधन होते. आधुनिक काळामध्ये सुद्धा चित्र एकदम पालटलेले नाही. अजूनही राष्ट्रीय उत्पन्न समिती व सेंट्रल स्टेटसिकल ऑर्गनायझेशनच्या 1971 च्या आकडेवारीनुसार एकूण 70 टक्के लोक आपल्या उदरनिर्वाहासाठी शेती व संबंधित व्यवसायावर अवलंबून आहेत. भारतीय शेती परंपरागत पद्धतीने नुसार केली जात होती कारण ती पावसाच्या लहरीवर अवलंबून होती. ब्रिटिशांसाठी कच्च्या मालाची बाजारपेठ अशीच त्या वेळच्या हिंदुस्तानची प्रसिद्धी जगभर झालेली होती. अशा वातावरणामध्ये ज्या संस्थानांमधील बहुसंख्य लोक आपल्या उपजीविकेसाठी शेतीवर अवलंबून होते तिथे शेतीकडे दुर्लक्ष करून संस्थांन अधिकाऱ्यांना चालणार नव्हते किंबहुना ज्यांनी आपल्या प्रजेच्या भरभराटीचे कंकण हातात बांधून घेतले होते त्यांना शेतीकडे डोळेझाक करणे शक्य नव्हते असे जे काही अगदी मोजके लोक होते त्यामध्ये आपल्याला शाहू महाराजांचा समावेश करावा लागेल. संपूर्ण ब्रिटिश हिंदुस्थानात महाराजांच्या काळात 80 टक्के लोक शेतीवर अवलंबून होते. कोल्हापूर संस्थांचे बहुसंख्य लोक शेतीवर आपली

उपजीविका करीत होते.आठ नोव्हेंबर 1917 च्या शेती ह्या विषयावरच्या आपल्या भाषणात या प्रश्नाचे सांगोपांग विवेचन शाहू महाराजांनी केलेले होते.

**प्लेग व दुष्काळ आणि शाहू महाराज :**अगदी आधुनिक काळाचा विचार केल्यासही आपल्याला असे दिसून येईल की एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी फार मोठ्या प्रमाणात भारतात सर्व ठिकाणी दुष्काळ पसरलेला होता. 860 ते विसाव्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत काही मोजकी वर्षे सोडल्यास भारताचा आर्थिक इतिहास आपल्याला दुष्काळाच्या दारिद्र्याच्या कथा सांगतो. शाहू महाराजांनी 894 मध्ये कोल्हापूर संस्थांचा कारभार पाहण्यास सुरुवात केली आणि त्याकाळी सामाजिक व राजकीय परिस्थिती अनुकूल नव्हती आणि आर्थिक परिस्थिती तर फारच प्रतिकूल होती. कारभारात नुकतेच कुठेतरी लक्ष घालण्यास शाहू महाराजांनी सुरुवात केली होती तोच संस्थानावर दुष्काळाची छाया पसरली. लेकच्या साथीने आपली चाहूल दाखवली आणि 22 वर्षाच्या या तरुण राज्याने ज्या पद्धतीने दुष्काळात व साथीच्या रोगास झुंज दिली ती पहिली म्हणजे खरोखर आचार्य वाटल्यापासून राहणार नाही.

**समारोप :** दुष्काळाची वार्ता समजल्यानंतर महाराजांनी आपल्या सर्व महसूल अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष भेटून दुष्काळाची स्थिती पाहण्यासाठी आधीच दिले आणि त्याप्रमाणे महसूल अधिकाऱ्यांनी शाहू महाराजांच्या दरबाराला भेट देऊन हुकूम दिल्याची माहिती दिली. आपल्या संस्था दुष्काळ कामाची तरतूद करण्याकडे आपण प्रत्यक्ष जे लक्ष देत आहात याबद्दल जे प्रयत्न यशस्वी झाले आहेत त्याबद्दल मी आपले अभिनंदन करतो असे महसुली अधिकाऱ्यांना सांगितले. राजर्षी शाहू महाराजांनी 1894 ते 1922 या कालखंडात कोल्हापूर संस्थांचा कारभार छत्रपती या नात्याने पाहिला. त्यांनी समाज कल्याण आणि आर्थिक विकास घडवून आणण्याकरिता निश्चित अशा स्वरूपाची पुरोगामी आर्थिक धोरणे आखली. राजर्षी शाहू महाराज हे किती मोठे राजे होते त्यापेक्षा किती मोठ्या मनाचा राजा होता हे पाहणे मनाला आनंद देणारे आहे. शाहू महाराजांच्या सारखा थोर माणूस समाजाला जाग आणावी म्हणून धडपडत होता हे राजर्षी शाहू महाराजांच्या कार्यावरून दिसून येते. भारतीय राजकारणामध्ये आरक्षणाचे धोरण आजही वादग्रस्त ठरले आहे. समाजातील अनेक जातीचे लोक आरक्षणासाठीची आंदोलने करीत आहेत. त्यामुळे सुप्रीम कोर्टाला निर्णय घेताना अनेक अडचणी येतात. आरक्षण म्हणजे हे एक सकारात्मक भेदभावाचे तत्त्वज्ञान आहे, हे तत्त्वज्ञान भारतामध्ये महात्मा फुलेंच्या विचारातून निर्माण झाले असून त्याचा विकास कालांतराने शाहू महाराज भारतातील अनेक संस्थाने ब्रिटिश शासनाचे सुधारणा कायदे वेगवेगळया आदेशाद्वारे देऊन ते भारतीय राज्यघटनेत समाविष्ट होईपर्यंत झालेला आहे यात बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका ही महत्त्वाची आहे. सयाजीराव गायकवाड आणि शाहू महाराज या दोघांनी बाबासाहेब आंबेडकरांना शैक्षणिक कार्यासाठी आर्थिक मदत केली आहे त्यामुळे त्यांच्या विचारांचा प्रभाव आंबेडकरांच्यावरती होता.

**संदर्भ :**

१. बब्रुवान मोरे, (२०१८), राजर्षी शाहू महाराज लोकशाही राजा, पान नं. १०७ ते ११०.

२. राजेंद्र बगाटे (२०१९),राजर्षी शाहू महाराजांचे महिलांच्या समस्यांशी निगडीत कार्य आणि सध्याचे सादरीकरण, पान नं. २१-२८.

३. प्रकाश पवार (२०१४), शाहू महाराजांच्या मिथकाचे विविध अर्थ, पान नं. १-३.

४. विजय कुंभार (२०१८), सामाजिक बदल आणि आर्थिक उन्नतीसाठी शिक्षण: राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे दृश्य, पान नं. २५००० ते २५००२.

५. पाटील प्रदीप (२०२०), छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचे सामाजिक योगदान- एक अभ्यास, पान नं. १०९९-११०२.

६. रमेश जाधव (२०१६), राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, पान नं. १५-२९.